डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ७०३ /२०२६ दि. ०७ /०५/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभाग हदद्दीत कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या नेहरू रोडवरील डोबिंवली पुर्व येथील गणपती मंदीर गेट ते ब्लॉसम शाळा, ठाकुर्ली ब्रिज दरम्यान रस्त्यावर दिनांक ०२/०५/२०२६ रोजी ते दिनांक १५/०५/२०२६ रोजी पावेतो सिमेंट रस्ता कॉक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार आहे. सदर रस्त्यावरील नेहरू रोडच्या दिशेने जाणारी वाहतुक दिनांक ०२/०५/२०२६ रोजी ते १५/०५/२०२६ रोजी पावेतो दरम्यानच्या रस्त्यावर बंद करून इतर मार्गाने वळवण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** डोंबिवली पुर्व स्टेशन रोड कडुन नेहरू रोडवरून ठाकुर्ली ब्रिजकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणेश मंदीर गेट नेहरू रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने उजवे वळण घेवुन गणेश मंदीर रोडने छेडा रोड, व्ही पी रोड मार्गे ईच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** ठाकुर्ली ब्रिज व ठाकुर्ली पुर्व स्टेशनकडुन ब्लॉसम शाळा, नेहरू रोड मार्गे डोंबिवली पुर्व स्टेशन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ब्लॉसम इंटरनॅशनल शाळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने डावे वळण घेवुन व्ही पी रोड किंवा छेडा रोड मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दिनांक ०२/०५/२०२६ रोजी ते दिनांक १५/०५/२०२६ रोजी पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.